**आरबीआय/२००५-०६/२८२**
**डीबीओडी.बीपी.बीसी. के. ५६/२१.०१.००१/२००५-०६**

जानेवारी २३, २००६

**सर्व व्यावसायिक बँकांचे (आरआरबीज वगळून) अध्यक्ष/मुख्याधिकारी**

प्रिय महोदय,

**अकाउंट पेयी धनादेशांची वसूली - तिसऱ्या पक्षाच्या खात्यात रक्कम जमा करण्यास मनाई**

जसे बँका जाणून आहेत कि अकाउंट पेयी धनादेश हे पेयी घटकाने वसूली करणे आवश्यक आहे. बँकेच्या नावे काढलेल्या अकाउंट पेयी धनादेशाच्या संबंधात, आमच्या परिपत्रक डिबीओडी.क्र.बीसी.२३/२१.०१.००१/९२ दिनांकित सप्टेंबर ९, १९९२ अन्वये असे निदर्शित केलेले आहे कि, अन्य बँकानी त्यांच्या नावे "अकाउंट पेयी" असे चिन्हांकित करून काढलेले धनादेश ज्या बँका काढण्याच्या योग्य आदेशाविना त्यात पेयी म्हणून नाव नसलेल्या घटकांच्या खात्यात जमा करतात त्यांनी ते स्वतःच्या जबाबदारीवर करावे आणि अशा बँका अनाधिकृत प्रदानासाठी जबाबदार असतील.

२. नुकताच काही व्यक्तिंनी/एककानी इनिशियल पब्लिक ऑफर(आयपीओ) प्रक्रियेचा केलेला दुरुपयोग आणि याबाबतीत सेबी कडून मिळालेल्या अहवालाच्या दृष्टीकोनातून, आरबीआयने विविध पक्षांनी यंत्रणेत लबाडी करण्यासाठी वापरलेल्या कार्य प्ध्दतीचा शोध घेण्यासाठी काही बँकांची सविस्तर चौकशी हाती घेतली होती. असे निदर्शनाला आले कि, उपरोक्त सूचना देऊनहि, बँकानी व्यक्तिंच्या अकाउंट पेयी परताव्याच्या आदेशाच्या रकमा डिपी पुरविणाऱ्यांच्या विनंतीवरून व्यक्तिच्या खात्याऐवजी दलालांच्या खात्यात जमा केल्या. यामूळे प्रदान यंत्रणेत लबाडी झाली आहे आणि त्यामुळे अनियमिततेच्या गुन्ह्याची सोय झाली आहे. ही लबाडी, बँकानी अकाउंट पेयी धनादेशाच्या वसूलीच्या कार्यपध्दतीचे उल्लंघन केले नसते तर झाली नसती. हे उल्लंघन सुजाण बाजार पध्दती म्हणूनहि मानता येणार नाही कारण त्यामुळे बँकाना विविध जोखमीना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

३. कायदेशीर गरजांशी आणि विशेष करून निगोशिएबल इंस्ट्रूमेंटास अधिनियमाच्या हेतूशी सुसंवादित्वाच्या दृष्टीने आणि अनाधिकृत वसूलीद्वारे बँकेच्या दायित्वात भर पडण्यापासून बँकाना वाचविण्यासाठी, आणि प्रदान आणि बँकिंग यंत्रणेचा प्रामाणिकपणा आणि निरोगीपणाच्या हितासाठी, आणि भूतकाळात नुकत्याच निदर्शनास आलेल्या उल्लंघनाच्या घटनांची पुनरुक्ति टाळण्यासाठी, करणे आवश्यक असल्याबद्दल समाधान झाल्यामुळे, रिझर्व बँकेला, बँकाना "अकाउंट पेयी" धनादेश त्यावर नाव असलेल्या व्यतिरिक्त अन्य कोणाच्याहि खात्यात जमा करण्यास मनाई करणे आवश्यक वाटते. त्यानुसार रिझर्व बँक सर्व बँकाना आदेश देत आहे कि, त्यानी पेयी घटाकाव्यतिरिक्त अन्य कोणसाठीहि अकाउंट पेयी धनादेश वसूल करू नयेत.

४. जेव्हा ड्रॉअर/पेयी बँकेला वसूल केलेली रक्कम पेयी व्यतिरिक्त अन्य कोणत्याहि खात्यात जमा करण्याची सूचना देतात, तेव्हा अशी सूचना "अकाउंट पेयी" च्या अंगभूत गुणांच्या हेतूंच्या विपरित असल्यामुळे. बँकेने ड्रॉअर/पेयी यांना धनादेश किंवा ड्रॉअरला अकाउंट पेयी आदेश मागे घेण्यास सांगावे. ही सूचना एका बँकेने दुसऱ्या बँकेला दिलेल्या धनादेशानांसुध्दा लागू होईल. बँकेच्या परिपत्रक डीबीओडी क्र. बीसी.२३/२१.०१.००१/९२ दिनांकित सप्टेंबर ९, १९९९२ मधील सूचना त्या अनुषंगाने दुरुस्त करण्यात आली आहे.

५. हे आदेश बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ३५ ए अधीन प्राप्त झालेल्या अधिकारात देण्यात आले आहेत.

आपला विश्वासू,
(आनंद सिन्हा)
कार्यकारी संचालक